**नवी मुंबई महानगरपालिका**

**महानगरपालिका सचिव कार्यालय, नवीन मुख्यालय, ३ रा मजला, बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.**

**-: सर्वसाधारण सभेची नोटीस :-** **दिनांक १३/०१/२०१५.**

नवी मुंबई महानगरपालिकेची **जानेवारी महिन्याची दुसरी सर्वसाधारण सभा, बुधवार, दिनांक २१ जानेवारी २०१५ रोजी सकाळी ११.०० वाजता** बेलापूर, भुखंड क्रमांक ०१, सेक्टर १५ए, नवी मुंबई महानगरपालिका, नवीन मुख्यालय येथील ५ व्या मजल्यावरील **राजमाता जिजाऊ सभागृह** येथे खालील विषयांवर विचार करण्यासाठी भरेल :-

**१.** प्रश्नोत्तरे.

**आयुक्तांकडील प्रस्ताव :**

**२.** अखिल भारतीय स्थनिक स्वराज्य संस्था, मुंबई यांना गौरव म्हात्रे कला केंद्र, सीबीडी येथील जागा "लिव्ह ॲन्ड लायसन्स" तत्वावर देणेबाबत.

**३.** नमुंमपा क्षेत्रातील समाजमंदिरे/व्यायामशाळा/बहुउद्देशिय इमारती/सांस्कृतिक भवन/वाचनालय इमारती परवानगी व अनुज्ञा (Leave & Licence) तत्वावर देणेबाबत.

**ठरावाच्या सूचना :**

**४ ते ६. श्री. बाळकृष्ण चाहू पाटील, यांजकडून :-**

**(४)** प्र. क्र. २० मधील मौजे गोठिवली गावातील आर्या कम्प्युटर ते सेक्टर २९/३० गोठिवली येथील यशोदिप सोसायटी पर्यत आर.सी.सी. गटार बांधणे. **(५)** प्र. क्र. २० मधील मौजे तळवली गावात कोळी बांधव जास्त प्रमाणात असून तेथे आजपर्यत मासळी मार्केट नाही तरी सदर ठिकाणी मासळी मार्केट बांधणे. **(६)** प्र. क्र. २०, सेक्टर २९/३० गोठिवली येथे आर.सी.सी. नाला व गटार व अंतर्गत फुटपाथ बांधणे.

**७ ते ९. सौ. सुरेखा रविंद्र इथापे, यांजकडून :-**

**(७)** प्र. क्र. ८०, नेरुळ, सेक्टर १९ व १९अे च्या नाल्यालगत संरक्षक कठडा बांधणे. **(८)** प्र. क्र. ८०, नेरुळ, सेक्टर १९ येथील कै. यशवंतराव चव्हाण मैदानात चारही बाजूने बैठक व्यवस्था, तरणतलाव, बॅडमिंटन व टेनिस कोर्ट जागतिक दर्जाची जीम व अद्यावत असे लग्न व इतर कार्यासाठी समाजमंदिर व्हावे. **(९)** प्र. क्र. ८०, नेरुळ, सेक्टर १९अे येथील रायन इंटरनॅशनल स्कुल ते हर्बर व्हयु सोसायटीच्या रस्त्याची सुधारणा करणे.

**१० ते १२. श्री. भोलानाथ महादू ठाकूर, यांजकडून :-**

**(१०)** प्र. क्र. १, ईश्वरनगर परिसरातील गटारावरचे झाकण व गटारावरची चौकट सर्व नवीन लावण्याची आणि पदपथ बांधण्याची तरतूद करणे. **(११)** प्र. क्र. १, ईश्वरनगर विभागात वाढीव लोकसंख्या पहाता ईश्वरनगर येथे रेल्वे लाईन वर पादचारी पूल बांधण्याची तरतूद करणे. **(१२)** प्र. क्र. १, ईश्वरनगर मधील १४ चे नामकरण करण्याची तरतूद करणे.

**१३ ते १५. श्री. काशिनाथ जनार्दन पाटील, यांजकडून :-**

**(१३)** प्र. क्र. ६५, जुईनगर, सेक्टर २३ येथील जुईपाडा गावामधील समाज मंदिराच्या कामाच्या २ ते ४ मजल्या पर्यंतच्या वाढीव बांधकामाच्या रक्कमेला मंजुरी देणे. **(१४)** प्र. क्र. ६५, सानपाडा, सेक्टर १० प्लॉट नं. १८७ येथील समाजमंदिराच्या कामाच्या २ ते ४ मजल्या पर्यंतच्या वाढीव बांधकामाच्या रक्कमेला मंजुरी देणे. **(१५)** प्र. क्र. ६५, जुईनगर, सेक्टर २३ येथील नवी मुंबई महानगरपालिका शाळा क्र. १७ च्या सभोवती संरक्षणभिंत उभारणे.

**१६ ते १८. श्री. चंद्रकांत रामदास पाटील, यांजकडून :-**

**(१६)** प्र. क्र. २२ मधील अडवली-भुतवली या गावात गार्डन (बगीचा) करण्यात यावा व तसेच त्या ठिकाणी ज्येष्ठ नागरिकांसाठी बसण्याकरिता आसनव्यवस्था करणे. **(१७)** प्र. क्र. २२ मधील अडवली-भुतवली येथील शाळेचे वाढीव बांधकाम करुन तेथे अभ्यास वर्ग सुरु करणे. **(१८)** प्र. क्र. २२ मधील महापे MIDC तलावाशेजारी जॉगिंग ट्रॅक बांधण्यात यावा. तसेच सभोवताली सुशोभिकरण करण्यात यावे तसेच महापे विभागातील पुरातन वृक्ष आहेत त्यांना कठडा बांधणे.

**१९ व २०. सौ. अपर्णा नविन गवते, यांजकडून :-**

**(१९)** प्र. क्र. ४, साठेनगर, दिघा येथील os-१ भूखंडाचे उर्वरित जागेवर ठाणे-बेलापूर रोड रुंदीकरणात बाधीत पुर्नवसित लोकांकरिता शाळा व नागरी आरोग्य केंद्र बांधुन त्यांची मुलभूत सोय करणे. **(२०)** प्र. क्र. ४, दिघा, गट नं. ९५/२ या आमचे मालकीचे जागेतून नवी मुंबई महानगरपालिकेचा कॉंक्रीटचा रस्ता जात असून सदर रस्त्यामुळे आम्ही बाधीत होत आहे. तर आम्हाला, जागा मालकांना जे सदर रस्त्यामुळे बाधीत होत आहेत त्यांना महापालिकेतर्फे मोबदल्यात इतरत्र जागा किंवा मोबदला देणे.

**२१ ते २३. सौ. सरोज रोहिदास पाटील, यांजकडून :-**

**(२१)** प्र. क्र. ८१ मधील आग्रोळी गांव सेक्टर १ पोलिस लाईन, सेक्टर ९ तसेच सेक्टर ९ एन रो-हाऊस मधील नादुरुस्त व तुटलेली आर. सी. सी. गटारावरची झाकणे बदलणे. **(२२)** आग्रोळी तलावाच्या संरक्षण भिंतीला तडे गेलेले असून भिंतीवरील ग्रील तुटलेल्या व गंजलेल्या आहेत. त्यामुळे अपघात होण्याची शक्यता आहे. तरी सदरच्या ठिकाणी नवीन संरक्षणभिंत बांधण्यात यावी व ग्रिलचे काम करणे. **(२३)** प्र. क्र. ८१ मधील एकता गार्डन, रॉक गार्डन व आण्णाभाऊ साठे उद्यानाची दुरावस्था झालेली आहे. त्यामध्ये उद्याना अंतर्गत फुलांची झाडे कोमजलेली आहेत तर बेंचेस व लहान मुलांचे पाळणी, खेळणी व बाकडे नादुरुस्त व तुटलेल्या अवस्थेत आहेत. तर संबंधीत उद्यानाचे नुतनीकरण करणे.

**मा. महापौरांच्या आदेशावरून,**

**सही/-**
**(चित्रा बाविस्कर)**
**महानगरपालिका सचिव (प्र.),**
**नवी मुंबई महानगरपालिका.**

**महापालिका सचिव कार्यालय,**
**नवी मुंबई महानगरपालिका,**
**दिनांक १३ जानेवारी २०१५.**